| | |
|---|---|
| | विशेष दिवाणी दावा क्र. ५३६/२०२२<br>कृष्णा दगडू वि. अलका चंद्रशेखर वगैरे<br>सीएनआर क्र. एमएचडिएच<br>०२०००२६१३२०२२ |

## निशाणी क्र. १३ वरील आदेश

प्रतिवादी क्र. ३ व ४ चे कथन की, त्यांच्या विधीज्ञांच्या घश्यास इंन्फेक्शन झाल्यामुळे ते मागील तारखेस लेखी कैफियत दाखल करु शकले नाहीत. त्यामुळे त्यांच्याविरुध्द दि. ०६.०२.२०२३ रोजी झालेला विना कैफियत आदेश रदद् होवून लेखी  कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळावी म्हणून सदरचा अर्ज केलेला आहे.

२) वादीने प्रस्तुतच्या अर्जाला म्हणणे दाखल केले की, अर्जातील कारण संयुक्तीक व योग्य नसल्याने अर्ज नामंजूर करण्यात यावा.

३) अभिलेखाची पडताळणी केली असता प्रतिवादी क्र. ३ व ४ यांना समन्सची बजावणी होवून ते दि. २८.११.२०२२ रोजी प्रस्तुत प्रकरणात हजर झाले आहेत. त्यानंतर  दि. ०६.०२.२०२३ रोजीपावेतो प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी त्यांची लेखी कैफियत दाखल न केल्यामुळे विना लेखी कैफियत आदेश पारीत करण्यात आला. प्रस्तुतचे प्रकरण हे वादीच्या ताब्याला भाडे नियंत्रण कायदयाचे संरक्षण प्राप्त झाले असे ठरवून मिळण्याकरीता तसेच विशिष्ट करार पूर्तीसाठी दाखल करण्यात आले असून पक्षकारांच्या स्थावर मिळकतीमधील गुंतलेले हितसंबंध पाहता कोणतेही प्रकरण गुणदोषावर चालवून निकाली होणे अपेक्षित असते त्यामुळे प्रतिवादींना लेखी कैफियत दाखल करण्याची पुनःश्च संधी देणे उचित ठरेल.  सबब पुढील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज रु. २००/– खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ३ व ४  यांनी  खर्च रु.२००/– आज रोजी किंवा पुढील

तारखेच्या आत जमा केल्यानंतर त्यांना प्रस्तुत प्रकरणात लेखी कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

Digitally signed by KULKARNI MADHURI SUDHAKAR
Date: 2023.03.03 15:37:40 +0530

**(माधुरी एस. कुलकर्णी)**
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
धुळे.

दिनांक - ०३/०३/२०२३

**–: <u>प्रमाणपत्र</u> :–**

मी प्रमाणित करते की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकूरातील शब्द न् शब्द मूळ आदेशाप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | नि.यु.भालेराव. |
| न्यायालयाचे नांव | दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, धुळे. |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | ०३.०३.२०२३ |

स्वाक्षरित/–
लघुलेखक(श्रे.२).